भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानूमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक १९.०४.२०१९ ते २३.०४.२०१९)

| अंक ३२/२०१९ | दिनांक १८.०४.२०१९ | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१२/०४/२०१९ ते १८/०४/२०१९ पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता १७/०४/२०१९ ते २१/०४/२०१९ पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२/०४ | १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | १८/०४ | दिनांक | १९/०४ | २०/०४ | २१/०४ | २२/०४ | २३/०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३८.० | ३८.० | ३८.५ | ३८.५ | ३५.५ | ३५.० | ३८.० | कमाल तापमान (अं. से) | ३६ | ३६ | ३४ | ३५ | ३८ |
| २४.० | २४.० | २२.० | २१.५ | २३.० | २२.० | १९.५ | किमान तापमान (अं. से) | २१ | २३ | २४ | २४ | २५ |
| निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | सकाळ मेघाच्छादन (ऑक्टा.) | ० | १ | १ | १ | ० |
| निरभ्र | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | दुपार | | | | | |
| ८४ | ८४ | ९२ | ९३ | ८४ | ८४ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७४ | ८१ | ७८ | ७६ | ६४ |
| ५४ | ४१ | ४५ | ५२ | ५६ | ४० | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १९ | २६ | ३१ | ३४ | २५ |
| ०.३ | ०.३ | ०.७ | ०.६ | ०.९ | ०.५ | ०.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ०१० | ००६ | ००५ | ००८ | ००९ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ वा-याची दिशा | पूर्वे कडून | आग्नेये कडून | आग्नेये कडून | आग्नेये कडून | दक्षिणे कडून |
| दक्षिणे | दक्षिणे | पुर्वे | पुर्वे | दक्षिणे | दक्षिणे | | दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०१८) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०१९ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ३२६९.२ | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** साधारणतः हवेतील तापमानात वाढ होऊन हवामान अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| सुर्यफुल | काढ्णी | काही ठिकाणी सुर्यफुल पीक तयार झालेले आहे. वाळलेली फुले विळ्याने कापुन ऊन्हात वाळवावी आणि शक्य असल्यास मशीनच्या सहाय्याने अथवा काठीने दांड्कून दाणे वेगळे करावेत. उफणणी करुन दाणे स्वच्छ करावेत आणि ऊन्हात वाळवून साठवुन ठेवावेत. |
| वायंगणी भात | काढ्णी | भाताच्या काही जातींमध्ये भात कापणीच्या अवस्थेत आहे. कापणीपुर्वी ८ ते १० दिवस अगोदर शेतातील पाणी काढावे. तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने विकसीत केलेल्या वैभव विळ्याच्या सहाय्याने जमीनीलगत करावी. भात कापणी केलेल्या शेताची नांगरट करुन धसकटे नष्ट करवीत. |
| भुईमुग | शेंगा भरणी | काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याचच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पिवळी होऊन गळु लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळ्वुन नंतर साठवणुक करावी.<br>काही ठिकाणी भुईमुग व सुर्यफुल पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. ऊष्णतेमध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पीकाला दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये गरज असल्यास जादा पाणी दुयावे. |
| आंबा | काढ्णी | पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रति झाड १५०-२०० लि. पाणी १५ दिवसांच्या अंतराने द्यावे. बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे आच्छादन द्यावे.<br>नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देउन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>जिल्हयामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढ्णीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. काढलेली फळे साका टाळण्यासाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनुसार बुरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. |
| काजु | फळधारणा | काजुमध्ये काढणीयोग्य बी तयार झालेली आहे. तयार झालेल्या बीयांची काढणी करुन ती ऊन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवावी. |
| माती परिक्षण | - | पिकांच्या काढणीनंतर पिकांची धसकटे, पालापाचोळा, गवत ईत्यादी शेतामध्ये जाळु नयेत, जाळले असता जमिनीतील पिकांच्या पोषण द्रव्यांचा -हास होतो व जमिनीची सुपीकता कमी होते. जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |
| भाजीपाला कलिंगड | फुलोरा ते फळधारणा | वेलवर्गीय भाजीपाला क्षेत्रामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापिठाने विकसित केलेले क्यु ल्युर युक्त रक्षक सापळे हेक्टरी चार या प्रमाणात लावावेत. कलिंगडाच्या रोपांवर, वेलिंवर पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मिलि डायमिथोएट प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करुन फवारणी करावी. |
| नारळ | फुलोरा | नारळावरील गेंड्या भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त माड साफ करुन सर्वात वरील पानांच्या बेचक्यात २% मिथील पॅराथिऑन पावडर ५० ग्रम + ५० ग्रम वाळु याचे समप्रमाणात मिश्रण करुन भरावे. बागेमध्ये शेणखताच्या अळ्यांना मारण्यासाठी ५०% पा.मि. कार्बारिल भुकटी ४० ग्रम प्रती १० लि. पाण्यात मिसळुन फवारावी. नारळावरील पानांवरील ठिपके या रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. तसेच कोंबकुजव्या रोगाने मेलेले माड रोगाचा पुढील प्रादुर्भाव रोखण्यासाठी जाळुन नष्ट करावेत. |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुटपालन | | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबड्यांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन पडदे लाऊन त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. कोंबड्यांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी संशोधन संचालक/नोडल ओफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>प्रा.फ.सं.के. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग<br>(०२३६६-२६२२३४, २६२६९३) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|